**फौ.कि.अर्ज क्र.०५/२०२६ मधील निशाणी १ वरील आदेश**

**(महादेव कुडव विरुध्द सरकार)**

**सीएनआर क्र.एमएचएसआय–०५–०००१४८२०२६**

०१. अर्जदार महादेव वामन कुडव, वयः ६४ वर्षे, धंदाः शेती, रा. ११६५, कुडव टेंब, इन्सुली, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, वेंगुर्ला पोलीस ठाणे यांनी गु.नों.क्र.४८/२०२६ मध्ये अर्जदार यांच्या मालकीचे सुमारे ०५ वर्षे वयाचे गावठी जातीचे उभी शिंगे असलेले एक काळ्या पांढऱ्या रंगाचा व एक तपकिरी रंगाचा असे एकत्रीत दोन बैल जप्त केलेले आहेत. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदार याने सदर जप्त बैलांचा तात्पुरता ताबा मिळावा अशी विनंती केली आहे.

०२. तपासीक अंमलदार यांनी आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, गु.नों.क्र.४८/२०२६ मधील जप्त जनावरे ही वाहनामध्ये दाटीवाटीने वेदना होतील अशा रितीने भरुन त्यांना हालचाल करता येणार नाही अशा बंदिस्त अवस्थेमध्ये वाहतूक करताना मिळून आलेले आहेत. तसेच अर्जदार हे पाण्याची व चाऱ्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयीपणे वागवून देऊन जनावरे ही विनापरवाना वाहतूक करीत होते. तसेच त्यांचेकडे कोणतेही वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र नव्हते. सदर जप्त जनावरे सुरक्षिततेकरीता तसेच त्यांचे चारापाण्याच्या व्यवस्थेकरीता सरसोली धाम, सरंबळ, ता.कुडाळ येथील खाजगी गो–शाळेमध्ये ठेवण्यात आलेली आहेत. सबब, सदर जनावरे अर्जदार यांच्या ताब्यात देण्यात येवू नये व सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती तपासिक अंमलदार यांनी केली आहे.

०३. सरकारी वकिलांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, अर्जदार हे सदर बैल जोडी ही शेतीच्या कामासाठी वापरणार आहेत हे कारण दिशाभूल करणारे असून सदरील जनावरे कत्तल करण्याकरीता नेली जात असल्याची शक्यता आहे. तसेच गुन्ह्याचा तपास चालू असून सदरची जप्त जनावरे ही अर्जदार यांच्या ताब्यात

दिल्यास, त्यांच्यावर पुन्हा निर्दयीपणे वागवून होवून त्यांची बेकायदेशीर कत्तल होण्याची शक्यता आहे. सदरील गुरे ही सरसोली धाम, सरंबळ, ता.कुडाळ गोशाळा येथे असून त्यांना गोशाळेमार्फत वैद्यकीय खर्च व पालनपोषणाचा खर्च केला जातो. त्यामुळे अर्जदार यांनी जनावरांच्या पालनपोषणाकरीता प्रत्येक दिवशी २००/– या प्रमाणे जनावरे जप्त केल्यापासून प्रस्तुत खटला निकाली होईपर्यंत खर्च द्यावा व जप्त जनावरे अर्जदाराच्या ताब्यात देण्यात येवू नयेत अशी विनंती सरकारी वकिलांनी केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जावर सरसोली धाम, खाजगी गोशाळा, सरंबळ, कुडाळ यांचे व्यवस्थापक यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, संस्थेने सदर बैलांच्या पालनपोषणाचा प्रतिदिन रक्कम रुपये ५००/– प्रमाणे खर्च केलेला आहे. सदर दोन्ही बैलांचा ताबा त्यांच्या मुळ मालकांना देईपर्यंत होणारा खर्च त्यांना देण्यात यावा, तसेच सदर बैलांचा ताबा मुळ मालकांना देण्यास त्यांची हरकत नाही.

०५. प्रस्तुतकामी प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता प्रथम खबरी अहवालानुसार घटनेवेळी एकूण २ जनावरे जप्त करण्यात आली असून घटनेवेळी वाहन चालक यास संबंधीत जनावरांची पशुवैद्यकीय अधिकारी यांनी जारी केलेली वैद्यकीय प्रमाणपत्रे अथवा फिटनेस सर्टिफिकेट याबाबत विचारणा केली असता वाहन चालक यांनी त्यांच्याकडे कोणतीही प्रमाणपत्रे नसल्याचे त्यांनी पोलीस अधिकारी यांना सांगितल्याचे स्पष्ट होते. सदर कथनांच्या अनुषंगाने प्राणी वाहतूक नियम, १९७८ मधील नियम ४७(अ) चे अवलोकन केले असता कोणत्याही जनावरांची वाहतूक करीत असताना, सदरची जनावरे ही वाहतूक करण्याकरीता चांगल्या निरोगी अवस्थेमध्ये असून त्यांना कोणतेही रोग झालेले नसून त्यांचे लसीकरण केल्याबाबत प्रमाणपत्र हे प्रमाणित वैद्यकिय अधिकारी यांच्यामार्फत घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रस्तुत जनावरांच्या वाहतूकीच्यावेळी अर्जदार यांच्याकडे सदर नियमाप्रमाणे कोणतेही प्रमाणपत्र नसल्याने त्यांनी प्राणी वाहतूक नियम, १९७८ मधील नियम ४७(अ) चा भंग केल्याचे स्पष्ट होते. या व्यतिरिक्त अर्जदार यांनी प्रस्तुतकामी जनावरे ही वाहतुकीच्यावेळी निरोगी अवस्थेत असल्याबाबतचे कोणतेही प्रमाणपत्रे अभिलेखावर

देखील दाखल केलेली नाहीत.

०६. या व्यतिरिक्त प्राणी वाहतूक नियम, १९७८ मधील नियम ५६ नुसार जनावरांची वाहतूक ही सुसज्ज अशा मालवाहतूक वाहनामधून करणे बंधनकारक असून सदर नियमांतील सर्व अटींचे पालन करणे आवश्यक आहे. तसेच सदर नियमानुसार सदर वाहनासोबत एक मदतनीस असणे आवश्यक आहे. परंतु अर्जदार यांनी प्रस्तुतकामी जनावरांची वाहतूक करताना नियम ५६ मधील अटींचे पालन केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतकामी जनावरांची वाहतूक ही प्राणी वाहतूक नियम (Transport of Animal Rules), १९७८ मधील नियम ५६ याचे उल्लंघन करुन करण्यात येत होती हे देखील स्पष्ट होते.

०७. अर्जदार यांच्या कथनानुसार त्यांनी जप्त जनावरे ही खरेदी केली असून सदरची दोन्ही बैल हे त्यांना शेतीचे कामाकरीता आवश्यक आहेत. अर्जदार यांच्या कथनांच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी ते शेती करतात हे दर्शविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार यांनी जनावरे ही शेतीकरीता खरेदी केल्याचे अर्जदार यांचे कथन संशयास्पद आहे. अर्जदार यांनी जनावरे वाहतुकीबाबत संबंधीत अधिका–यामार्फत देण्यात येणारे ना हरकत प्रमाणपत्र देखील दाखल केलेले नाही. तसेच अर्जदार यांनी जप्त जनावरांना नियमाप्रमाणे जनावरांच्या ओळखीकरीता कानबिल्ले (tag) लावलेली आहेत असे कोणतेही कथन त्यांच्या अर्जामध्ये केलेले नाही. त्यामुळे सदरची जनावरे ही सरकारी वकिलांच्या म्हणण्याप्रमाणे कत्तलीकरीता घेवून जात होती हे नाकारण्यास कोणतेही सबळ कारण अभिलेखावर नाही.

०८. प्रस्तुतकामी प्रथम खबरी अहवालामध्ये जनावरे ही क्रुर परिस्थितीमध्ये कोणत्याही वैद्यकीय परवान्याखेरीज घेवून जात होते हे स्पष्ट नमूद आहे. सदर प्रथम खबरी

अहवालाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालय यांचे **श्री छत्रपती शिवाजी गोशाळा वि. महाराष्ट्र शासन व इतर (२०२२ एस.सी.सी.ऑनलाईन एस.सी.१४०२)** या न्यायनिवाड्यातील निर्देशांचे अवलोकन केले असता सदर न्यायनिवाड्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालय यांनी परिच्छेद क्र.२१ मध्ये असे निर्देशित केले आहे की, "अर्जदार हा जनावरांचा अंतरिम ताबा मिळविण्यास इच्छुक आहे. गैरअर्जदार हा क्रुर परिस्थितीमध्ये कोणत्याही वैध परवान्याशिवाय जनावरांची प्रथमदर्शनी वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदरील जनावरे ही गैरअर्जदार यांच्या ताब्यात देण्याऐवजी अर्जदार यांच्या ताब्यात सुरक्षीत आहेत." त्यामुळे अभिलेखावर दाखल कागदपत्रे व **मा. सर्वोच्च न्यायालय यांचे श्री छत्रपती शिवाजी गोशाळा वि. महाराष्ट्र शासन व इतर** या न्यायनिर्णयातील निर्देशांच्या अनुषंगाने प्रस्तुत जनावरे ही गोशाळा सरंबळ यांच्याकडे सुरक्षित असून अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज सद्यस्थितीत मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. तसेच प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम [Prevention of Cruelty to Animals (Care and Maintenance of Case Property Animals) Rules, 2017] मधील नियम ५ प्रमाणे जनावरांच्या वाहतूक, निगा आणि उपचाराचा येणारा खर्च हा संबंधीत जनावरांच्या मालकाकडून वसूल करता येईल असे निर्देशित केले आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणाचा अंतिम निकाल होईपर्यंत सदरची जनावरे ही प्रस्तुत गोशाळेचे ताब्यामध्ये देण्यात येवून प्रत्येक जनावरांचा नियमाप्रमाणे प्रती दिवस येणारा खर्च देण्याचे आदेश अर्जदार यांना देणे देखील न्यायोचित होणार आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

०१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार यांनी नियमाप्रमाणे जनावरांचा दैनंदिन खर्च सरसोली धाम, सरंबळ, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील गोशाळा यांना प्रदान करावा.

०३. सरसोली धाम, सरंबळ, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील गोशाळा यांनी जनावरांच्या देखभालीकरीता योग्य ती व्यवस्था करावी.

०४. सरसोली धाम, सरंबळ, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील गोशाळा यांनी जनावरांच्या ओळखीकरीता त्यास कानबिल्ले (tag) लावावीत व तपासी अंमलदार यांनी त्या बाबतचा अहवाल दोषारोपपत्रासोबत जोडावा.

०५. अर्जदार यांनी त्यांचा पुर्ण रहिवाशी व कार्यालयीन पत्ता फोननंबरसहीत तपासी अंमलदार यांना द्यावा व अभिलेखावर दाखल करावा.

०६. तपासिक अंमलदार यांनी वरील सर्व बाबींची पुर्तता झाल्याबाबतचा अहवाल न्यायालयात दाखल करावा.

०७. या आदेशाची एक प्रत सदर गुन्हयाच्या रिमांड पेपर्स सोबत जोडण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE

Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.06.04 18:01:53 +0530

दिनांक :– ०४/०६/२०२६ **(एस.जे.चिवटे)**

ठिकाण :– वेंगुर्ला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वेंगुर्ला.